ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

नाशिक– ४२२ २२२

## मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

## बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (G15)

## माहितीपुस्तिका

**शैक्षणिक वर्ष : 2019–2020**

# बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम : माहितीपुस्तिका

**शिक्षणक्रम संकेतांक (Programme Code) : G 15**

## *अनुक्रमणिका*


१. विद्याशाखेचा परिचय ........ ४

२. बी.ए. (जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या) शिक्षणक्रमाविषयी ........ ४

२.१ शिक्षणक्रम संरचना

२.२ प्रवेश–पात्रता

२.३ शिक्षणक्रम शुल्क

२.४ कालावधी

२.५ माध्यम

२.६ मूल्यमापन प्रक्रिया

२.७ श्रेयांक

३. नोंदणी–प्रक्रिया ........ १२

४. विभागीय केंद्रे ........ १३

५. अभ्यासकेंद्रे ........ १४

६. विशेष सूचना / संपर्कासाठी ........ १५

परिशिष्टे ........ १७

परिशिष्ट 1 : University Grants Commission Resolution (2004)

परिशिष्ट 2 : G.R. of Equivalency for 10th and 12th

परिशिष्ट 3 : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

परिशिष्ट 4 : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

परिशिष्ट 5 : अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

# विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।
ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।
नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।
हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

*कुसुमाग्रज*


## निर्मिती

श्री. आनंद यादव
व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२



© २०१९, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक



- **प्रथम प्रकाशन** : जुलै २०१९
- **अक्षरजुळणी** : ॲकोसिस, नाशिक
- **प्रकाशक** : डॉ. दिनेश भोंडे, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

**NB-19-20-19**

# १. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे या विद्याशाखेत मानवनिर्मित कला, साहित्य या सर्जनशील निर्मितिव्यापाराचा आणि कुटुंबसंस्थेपासून राज्यसंस्थेपर्यंतच्या विविध संस्थांच्या रचनांचा, तत्त्वज्ञानाचा व इतिहास–परंपरांचा अभ्यास केला जातो. २१ व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. विद्याशाखेतील विविध शिक्षणक्रमांचा आशय हा मानवकेंद्री असतो. मानवी मूल्यांवर व माणसाच्या विकास–कार्यक्रमांवर भर देणारा आशय हे या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांचे वैशिष्ट्य आहे.

विद्याशाखेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात अशी :

१. जगभरातल्या विविध संस्कृतींचा, राष्ट्र–राज्यांच्या जडणघडणीचा, इतिहास परंपरांचा, बी.ए., एम.ए., एम. फिल. आणि पीएच.डी. शिक्षणक्रमांचा अभ्यासक्रमात समावेश.

२. मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता, इत्यादी मूल्ये, पर्यावरण रक्षणादी चळवळी, सार्क, युनो, इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांचे कार्य, स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुनादर्श, जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांच्या अभ्यासक्रमांमध्ये समावेश आहे.

३. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.

४. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

५. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.

६. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि व्यावसायिक यशासाठी लागणाऱ्या पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.

७. स्वयंअध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.

८. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.

९. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, उपग्रह सेवा व वेबमाध्यमांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सेवा अशा विविध अंगांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहाय्य.

१०. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

# २. शिक्षणक्रमाविषयी

एकूण १२० श्रेयांकांचा हा शिक्षणक्रम ३ वर्षे कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमासाठी प्रत्येक अभ्यासकेंद्रावर किमान २० व कमाल ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्यास जवळच्या अभ्यासकेंद्रावर विद्यार्थ्यांना त्यांची संमती असल्यास वर्ग करण्यात येईल. त्या केंद्रावर विद्यार्थ्यांना संपर्कसत्रे, अंतर्गत मूल्यमापन आणि परीक्षेसाठी जावे लागेल.

### ■ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

(१) मुद्रित व अमुद्रित प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना प्रसारमाध्यमांचे तत्त्वज्ञान व कार्यपद्धती याविषयी माहिती देणे.

(२) वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांतील विविध कौशल्यांचा परिचय करून देणे.

(३) ग्रामीण व शहरी क्षेत्रातून पत्रकार होऊ इच्छिणाऱ्यांची पत्रकारिताविषयक जाणीव वाढविणे.

(४) स्थानिक, छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांना, दूरचित्रवाणी आणि वेब माध्यमांना पत्रकारितेतील प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.

(५) जनसंपर्क अधिकाऱ्यासाठी लागणारी कौशल्ये अवगत करून देणे.

(६) बातम्यांची भाषांतरे करण्यासाठी लागणारी भाषांतर कौशल्ये शिकविणे.

## २.१ शिक्षणक्रम संरचना

| *वर्ष* | *अभ्यासक्रम* | *श्रेयांक* | | | *एकूण श्रेयांक* |
|---|---|---|---|---|---|
| | | *तात्त्विक* | | *प्रात्यक्षिक* | |
| ०१. | अधिष्ठान | ३६ | + | ०४ | ४० |
| ०२. | सर्वसाधारण क्षेत्रे | ३६ | + | ०४ | ४० |
| ०३. | विशेष क्षेत्रे | ३६ | + | ०४ | ४० |
| | **एकूण** | **१०८** | **+** | **१२** | **१२०** |

## गट १ : प्रथम वर्ष (अधिष्ठान अभ्यासक्रम)

### ०१. स्वयं-अध्ययन कौशल्ये (OPN 101)

पुस्तक १ : वाचन व लेखन कौशल्ये

पुस्तक २ : संभाषण व श्रवण कौशल्ये

पुस्तक ३ : निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयंनिर्देशित अध्ययन

### ०२. मराठी : ( MAR 101)

पुस्तक १ : भाषिक विनिमय : तत्त्व आणि व्यवहार

पुस्तक २ : मराठीचा भाषिक वापर (कार्यपुस्तिका)

पुस्तक ३ : भाषिक सर्जनशीलता : स्वरूप व प्रकार

पुस्तक ४ : मराठी भाषेचा सर्जनशील वापर (कार्यपुस्तिका)

### ०३. हिंदी व इंग्रजी : (HEN 101)

पुस्तक १ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना

पुस्तक २ : कार्यपुस्तिका

पुस्तक ३ : Foundation Course in English

पुस्तक ४ : Work Book

### ०४. सामान्यज्ञान व सामाजिक जाणीव : (GKN 101)

पुस्तक १ : विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य

पुस्तक २ : विकास : संकल्पना आणि मार्ग

पुस्तक ३ : संज्ञापनक्रांती व जैव तंत्रज्ञान

### ०५. मानव्यविद्या : (HUM 101)

पुस्तक १ : मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय

पुस्तक २ : प्रयोगाधिष्ठित व यंत्राधिष्ठित कला

पुस्तक ३ : कार्यपुस्तिका

### ०६. सामाजिकशास्त्रे : (SOC 101)

पुस्तक १ : इतिहास व राज्यशास्त्र

पुस्तक २ : समाजशास्त्र व मानसशास्त्र

पुस्तक ३ : अर्थशास्त्र व भूगोल

## गट २ : द्वितीय वर्ष : सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे

### ०१. वृत्तपत्रव्यवसाय व पत्रकारिता (MCJ 201)

पुस्तक १ : वृत्तपत्रव्यवसाय, स्वरूप व व्यवस्थापन

पुस्तक २ : बातमी व बातमीदार

पुस्तक ३ : ग्रामीण पत्रकारिता

### ०२. बातमीची विविध कार्यक्षेत्रे (MCJ 202)

पुस्तक १ : बातमीची सर्वसाधारण कार्यक्षेत्रे

पुस्तक २ : कृषी, सहकार व अर्थ-वाणिज्य क्षेत्रे

पुस्तक ३ : क्रीडा पत्रकारिता

### ०३. आधुनिक महाराष्ट्र (MCJ 203)

पुस्तक १ : आधुनिक महाराष्ट्र : लोकप्रशासन व अर्थकारण

पुस्तक २ : प्रबोधन परंपरा व वृत्तपत्रसृष्टीची वाटचाल

पुस्तक ३ : कला व साहित्य

### ०४. आधुनिक भारत (MCJ 204)

पुस्तक १ : भारताचे राजकारण

पुस्तक २ : आंतरराष्ट्रीय राजकारण व भारताचे परराष्ट्रसंबंध

पुस्तक ३ : भारताचे अर्थकारण, समाजकारण व संस्कृती

### ०५. मुद्रित माध्यमांसाठी लेखनकौशल्ये (MCJ 205)

पुस्तक १ : वृत्तपत्रे, वार्तालेख व सदरलेखन

पुस्तक २ : अग्रलेख, स्फुटलेख व वाचकांची पत्रे

पुस्तक ३ : भाषा व भाषांतर

### ०६. दृक्-श्राव्य माध्यमे : स्वरूप व कौशल्ये (MCJ 206)

पुस्तक १ : नभोवाणी

पुस्तक २ : दूरचित्रवाणी व माहितीपट

पुस्तक ३ : स्वरसाधना व सादरीकरण कौशल्ये

### ०७. पर्यावरण अभ्यास (EVS 201)

तसेच पर्यावरण अभ्यास (EVS 201) या अनिवार्य विषयाची परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागेल. या शिक्षणक्रमाचे गुण शिक्षणक्रमाचे अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात 'सी' श्रेणी मिळविणे अनिवार्य असेल.

## गट ३ : तृतीय वर्ष : विशेष अभ्यासक्षेत्रे

### ०१. जनसंज्ञापन व विकास संज्ञापन (MCJ 301)

पुस्तक १ : संज्ञापन, जनसंज्ञापन व विकास संज्ञापन

पुस्तक २ : संज्ञापनक्रांती : स्वरूप व परिणाम

पुस्तक ३ : प्रसारमाध्यमांचे अर्थकारण

### ०२. भारतीय राज्यघटना आणि शासनव्यवहार (MCJ 302)

पुस्तक १ : भारतीय राज्यघटनेची चौकट

पुस्तक २ : संसदीय कामकाज

पुस्तक ३ : प्रशासकीय संरचना व कामकाज

### ०३. पत्रकारिता : कायदे आणि नीतिमूल्ये (MCJ 303)

पुस्तक १ : प्रसारमाध्यमांशी संबंधित कायदे

पुस्तक २ : मानवी हक्क

पुस्तक ३ : पत्रकारितेची नीतिमूल्ये

## ०४. पत्रकारिता आणि संबंधित कार्यक्षेत्रे (MCJ 304)

पुस्तक १ : जाहिरात

पुस्तक २ : जनसंपर्क

पुस्तक ३ : छायाचित्र पत्रकारिता

## ०५. संपादन : स्वरूप व कौशल्ये (MCJ 305)

पुस्तक १ : वृत्तपत्राचे संपादन

पुस्तक २ : नियतकालिकांचे संपादन

पुस्तक ३ : ग्रंथनिर्मिती व संपादन

## ०६. प्रसारमाध्यमांतील संगणकीय उपयोजन व मुद्रणतंत्रे (MCJ 306)

पुस्तक १ : संगणक : रचना व उपयोजन

पुस्तक २ : ग्राफिक्स व डिझाईन

पुस्तक ३ : मुद्रणतंत्रे

## २.२ प्रवेश-पात्रता

| *प्रवेश-पात्रता* | *कालावधी* | *अभ्यासक्रम* |
|---|---|---|
| १२वी उत्तीर्ण किंवा वृत्तपत्रविद्या पदविकाधारक (यचममुवि) किंवा पूर्वतयारी अथवा समकक्ष शिक्षणक्रम उत्तीर्ण | ३ वर्षे | प्रथम वर्ष (अधिष्ठान) |

## २.३ शिक्षणक्रम शुल्क

### (१) प्रथम वर्ष (अधिष्ठान)

**शिक्षणक्रम शुल्काचा तपशील**

| क्र. | शुल्काचे शीर्षक | रक्कम |
|---|---|---|
| १) | प्रवेश व नोंदणी शुल्क | रु. १००/- |
| २) | शैक्षणिक शुल्क | रु. २५०/- |
| ३) | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | रु. ३००/- |
| ४) | विकास निधी | रु. २५०/- |
| ५) | संकीर्ण | रु. २००/- |
| ६) | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. ५००/- |
| | **एकूण शुल्क** | **रु. १,६००-** |

### (२) द्वितीय वर्ष (सर्वसाधारण क्षेत्रे)

**शिक्षणक्रम शुल्काचा तपशील**

| क्र. | शुल्काचे शीर्षक | रक्कम |
|---|---|---|
| १) | प्रवेश व नोंदणी शुल्क | रु. १००/- |
| २) | शैक्षणिक शुल्क | रु. १,०००/- |
| ३) | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | रु. १,०५०/- |
| ४) | विकास निधी | रु. २५०/- |
| ५) | संकीर्ण | रु. २००/- |
| ६) | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. १,०००/- |
| | **एकूण शुल्क** | **रु. ३,६००/-** |

### (३) तृतीय वर्ष (विशेष क्षेत्रे)

**शिक्षणक्रम शुल्काचा तपशील**

| क्र. | शुल्काचे शीर्षक | रक्कम |
|---|---|---|
| १) | प्रवेश व नोंदणी शुल्क | रु. १००/- |
| २) | शैक्षणिक शुल्क | रु. १,०००/- |
| ३) | परीक्षा (अंतर्गत/अंतिम) शुल्क | रु. १,०५०/- |
| ४) | विकास निधी | रु. २५०/- |
| ५) | संकीर्ण | रु. २००/- |
| ६) | अभ्यासकेंद्र शुल्क | रु. १,५००/- |
| | **एकूण शुल्क** | **रु. ४,१००/-** |

- विद्यापीठ हिश्श्याचे शुल्क ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. हे शुल्क रोखीने अथवा इतर कोणत्याही पद्धतीने स्वीकारले जात नाही. अभ्यासकेंद्र शुल्क रोखीने अथवा केंद्राच्या बँक खात्यावर जमा करावे आणि त्याची पावती घ्यावी. माहिती पुस्तिकेत नमूद केलेल्या शुल्कापेक्षा अधिक रक्कम देऊ नये.

**शुल्क परत मिळण्याबाबत : एकदा प्रवेश घेतल्या-नंतर तो रद्द केला तरी शुल्क परत मिळणार नाही.**

- या शिक्षणक्रम शुल्कातच विद्यार्थ्यांना अध्ययनपुस्तके, कार्य-पुस्तिका दिली जाईल. **वरील शुल्काखेरीज अन्य कोणत्याही स्वरूपाचे शुल्क विद्यापीठाला अपेक्षित नाही.**

**शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना**

- ऑनलाईन प्रवेश करताना विद्यार्थ्यांनी प्रथमतः केवळ विद्यापीठ शुल्क त्या त्या वर्षाचे इंटरनेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, मोबाईल बँकिंग किंवा इतर प्रचलित ऑनलाईन कॅश ट्रान्सफर प्रक्रियेचा वापर करून भरावे. ऑनलाईन फी भरल्याच्या ट्रान्झॅक्शन नंबरची नोंद घेऊन पावती प्रिंट करून घ्यावी आणि प्रवेश अर्जाच्या प्रिंट सोबत जोडून अभ्यासकेंद्रावर जमा करावी.
- प्रवेश अर्जाची प्रिंट प्रत अभ्यासकेंद्रावर जमा करताना त्या वर्षीच्या भरलेल्या शिक्षणक्रम शुल्कातील अभ्यासकेंद्राचे शुल्क अभ्यासकेंद्राच्या बँक खात्यात बँक चलनाने भरून अथवा क्रॉस

केलेला अकाऊंट पेयी चेक अदा करून किंवा अभ्यासकेंद्राने निर्धारित केलेल्या अधिकृत पद्धतीने जमा करून पावती घ्यावी व ती शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत स्वतंत्र फाईलमध्ये जतन करून ठेवावी.

- अशा पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतिक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत आपण निवडलेल्या अभ्यासकेंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

## २.४ कालावधी

**अध्ययन कालावधी : ३ वर्षे, नोंदणी कालावधी : ८ वर्षे**

नोंदणी कालावधी संपल्यावर नव्याने प्रवेश घेऊन सर्व अभ्यासक्रम पूर्ण करता येतील.

## २.५ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांसाठी 'मराठी' हे शिक्षणाचे माध्यम राहील. अभ्यासक्रमांची पाठ्यपुस्तके, अभ्यासकेंद्रावरील मार्गदर्शन, इत्यादी मराठी भाषेतूनच उपलब्ध होईल. अंतर्गत मूल्यमापन आणि अंतिम परीक्षेची प्रश्नपत्रिका मराठीतूनच असेल. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करावयाचा असल्यास परीक्षेआधी विद्यापीठाची संमती घ्यावी लागेल.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून प्रवेश प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष अशा नैसर्गिक वाढीनेच होतील. इतर पद्धतीने प्रवेश होणार नाहीत.

## २.६ मूल्यमापन प्रक्रिया

### अंतर्गत मूल्यमापन

अभ्यासकेंद्रावरील संमंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावयाच्या प्रात्यक्षिकांचे व कार्यानुभवाचे मूल्यांकन अभ्यासकेंद्र-संमंत्रकांनीच करावयाचे आहे. त्याचा तपशील -

**(अ) प्रथम वर्ष : अधिष्ठान अभ्यासक्रम**

| क्र. | अभ्यासक्रम संकेतांक | प्रात्यक्षिक/कार्यानुभवाचे स्वरूप | गुण | श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| १. | OPN 101 (P) | (१) गृहपाठ | २५ | ०१ |
| २. | GKN 101 (P) | (२) गृहपाठ | २५ | |
| ३. | MAR 102 (P) | (i) मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका<br>(ii) मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका | २५<br>२५ | ०१ |
| ४. | HEN 101 (P) | (iii) हिंदी : कार्यपुस्तिका<br>(iv) इंग्रजी : कार्यपुस्तिका | २५<br>२५ | ०१ |
| ५. | HUM 101 (P)<br>SOC 101 (P) | (v) मानव्यविद्या : कार्यपुस्तिका<br>(vi) सामाजिकशास्त्रे : गृहपाठ | २५<br>२५ | ०१ |
| | | **एकूण** | **२००** | **०४** |

**(आ) द्वितीय वर्ष : सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे**

| क्र. | अभ्यासक्रम संकेतांक | प्रात्यक्षिक/कार्यानुभवाचे स्वरूप | गुण | श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| १. | MCJ201 (P) | (i) बातमीदारी : कार्यानुभव/ सर्वेक्षण<br>(ii) बातमी संपादन | २५<br>२५ | ०१ |
| २. | MCJ202 (P) | (iii) बातमी : कात्रणसंग्रह<br>(iv) वृत्तविश्लेषण | २५<br>२५ | ०१ |
| ३. | MCJ205 (P) | (i) वृत्तलेख-लेखन<br>(ii) अग्रलेख/सदर लेखन | २५<br>२५ | ०१ |
| ४. | MCJ206 (P) | (i) नभोवाणीसाठी लेखन<br>(ii) दूरचित्रवाणी/स्वरसाधना सादरीकरण | २५<br>२५ | ०१ |
| ५. | EVS 201 | पर्यावरण अभ्यास/गृहपाठ | २० | ०१ |
| | | **एकूण** | **२००** | **०४** |

**(इ) तृतीय वर्ष : विशेष अभ्यासक्षेत्रे**

| क्र. | अभ्यासक्रम संकेतांक | प्रात्यक्षिक/कार्यानुभवाचे स्वरूप | गुण | श्रेयांक |
|---|---|---|---|---|
| १. | MCJ304 (P) | (i) जाहिरात संग्रह व विश्लेषण<br>(ii) छायाचित्रण/ गृहपत्रिका संपादन | ५०<br>५० | ०१<br>०१ |
| २. | MCJ305 (P) | (iii) वृत्तपत्र/नियतकालिक/ ग्रंथ संपादन | ५० | ०१ |
| ३. | MCJ306 (P) | (iv) संगणकीय उपयोजन | ५० | ०१ |
| | | **एकूण** | **२००** | **०४** |

अभ्यासकेंद्र गुणयाद्या विहित मुदतीत विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकाकडे पाठवतील. अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्णतेसाठी ४०% गुण अनिवार्य असतील.

### अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्यांनी गृहपाठ, कार्यपुस्तिका, क्षेत्रीय सर्वेक्षण, कात्रणसंग्रह, पाहणी अहवालांच्या माध्यमातून प्रकल्प पद्धतीने अभ्यास करावयाचा आहे. त्याचे अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व मूल्यमापनाचे तपशील खाली दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्रावरील संमंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास पूर्ण करून त्यांच्याकडे आपापले प्रकल्प, कार्यपुस्तिका मूल्यमापनासाठी दिलेल्या मुदतीत सादर करावयाचे आहेत.

अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य विद्यार्थ्याने निर्धारित मुदतीत अभ्यासकेंद्रावर सादर करून संबंधित संमंत्रकांकडून गुणदान करून घ्यावे.

## (अ) प्रथम वर्ष : अधिष्ठान अभ्यासक्रम

**✣ OPN101: स्वयं-अध्ययन कौशल्ये : गृहपाठ (२५ गुण)**

खालीलपैकी कोणताही एक गृहपाठ पूर्ण करा.

१. तुम्ही वाचलेल्या कुठल्याही एका पुस्तकाचा ५०० शब्दांत परिचय करून द्या.

२. तुम्ही दूरचित्रवाणीवर पाहत असलेल्या कुठल्याही एका मालिकेचे/कार्यक्रमाचे ५०० शब्दांत खालील मुद्यांच्या आधारे शब्दांकन करा.
(विषय, कथानक, स्वभावदर्शन, जीवनविषयक दृष्टिकोन, मूल्ये, सादरीकरण शैली, इत्यादी.)

३. आपल्या रोजच्या जीवनात आढळणाऱ्या किमान २५ प्रतीकांचा/संकेतचिन्हांचा संग्रह करा. त्या प्रतीकांचा अर्थ व उपयोग त्या त्या चिन्हांसमोर लिहा.
(उदा. भारताचा राष्ट्रध्वज. आपण तिरंगा झेंड्याचे चित्र चिकटवावे. त्यासमोर केशरी, पांढरा, हिरवा या तीन रंगांचा व अशोकचक्राच्या योजनेचा संकेतार्थ लिहावा.)

४. ग्रंथालयातील माहितीच्या आधारे खालीलपैकी **कोणत्याही एका** व्यक्तीचा जीवनपट तयार करा.
(क) म. गांधी, (ख) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (ग) मदर तेरेसा, (घ) रवींद्रनाथ टागोर, (च) डॉ. अब्दुल कलाम, (छ) बाळशास्त्री जांभेकर, (ज) प्रबोधनकार ठाकरे, (झ) प्र.के. अत्रे, (ट) सुनील गावस्कर, (ठ) कुमार गंधर्व, (ड) व्ही. शांताराम, (ढ) इंदिरा गांधी, (ण) महर्षी धोंडो केशव कर्वे, (त) र.धों. कर्वे, (थ) दुर्गा भागवत, (द) प्रेमचंद, (ध) यशवंतराव चव्हाण, (न) धिरूभाई अंबानी, (प) विंदा करंदीकर, (फ) बाबा आमटे

**✣ GKN101 : सामान्यज्ञान व सामाजिक जाणीव : गृहपाठ (२५ गुण)**

०१. खालीलपैकी **एका** विषयावर कात्रणसंग्रह तयार करा. जमवलेल्या कात्रणांच्या आधारे किमान पाचशे शब्दांचा विश्लेषणात्मक वृत्तलेख लिहा.

| | |
|---|---|
| (क) पर्यावरण | (ख) प्रदूषण |
| (ग) आरोग्य | (घ) विज्ञान |
| (च) साहित्य | (छ) धर्म |
| (ज) जैवतंत्रज्ञान | (झ) सहकार |
| (ट) मानवी हक्क | (ठ) ग्राहक चळवळ |
| (ड) कला | |

**✣ MAR101 : मराठी (५० गुण)**

(१) मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका : २५ गुण
(२) मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका : २५ गुण

**✣ HEN101 : हिंदी - इंग्रजी (५० गुण)**

(१) हिंदी : कार्यपुस्तिका : २५ गुण
(२) इंग्रजी : कार्यपुस्तिका : २५ गुण

**✣ HUM101 : मानव्यविद्या**

(१) कार्यपुस्तिका : २५ गुण

**✣ SOC101 : सामाजिकशास्त्रे : गृहपाठ (२५ गुण)**

खालीलपैकी कोणताही **एक** गृहपाठ पूर्ण करा.

०१. जानेवारी ते डिसेंबर या कालखंडात घडलेल्या ठळक घटना-घडामोडींचा कालपट तयार करा. (या कालपटात राजकारण, शिक्षण, नैसर्गिक आपत्ती, पुरस्कार, युद्ध-घात, कला-क्रीडा व संस्कृती क्षेत्रातील उल्लेखनीय घडामोडी, थोरा-मोठ्यांचे मृत्यू, इत्यादींचा समावेश असावा.)

०२. कुठल्याही एका क्षेत्रातील ठळक घडामोडींचा कालपट तयार करा. (उदाहरणार्थ, ऑलिंपिक स्पर्धा-प्रारंभापासून आजपर्यंत, क्रिकेट/टेनिस वर्ल्डकप प्रारंभापासून-आजपर्यंत. मराठी साहित्य संमेलने-प्रारंभापासून ते आजपर्यंत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने-प्रारंभापासून ते आजपर्यंत, विज्ञानाची नोबेल पारितोषिके, ज्ञानपीठ पारितोषिके, इत्यादी)

०३. 'भारतीय राज्यघटना' या विषयावर ५०० शब्दांचा निबंध लिहा.

०४. भारतीय राज्यघटनेतील विविध घटना दुरुस्त्यांची यादी करा.

०५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर किमान ५०० शब्दांचा निबंध लिहा.
(क) शहरीकरणाच्या समस्या, (ख) शेतकऱ्यांच्या समस्या, (ग) समाजातील अंधश्रद्धांचे स्वरूप, (घ) धार्मिक कर्मकांड व रूढी परंपरा, (च) बदलती कुटुंबसंस्था, (छ) आदिवासींचे लोकजीवन, (ज) आधुनिकीकरणाचा जीवनशैलीवरील परिणाम, (झ) शालेय शिक्षणातील गळती-स्थगिती

०६. मानसशास्त्रातील व्यक्तिमत्त्व संकल्पनेच्या आधारे तुम्हांला भावलेल्या कुठल्याही एका व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष स्पष्ट करा.

०७. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निरीक्षणात्मक निबंध लिहा.
(क) ग्राहकाचे मानसशास्त्र, (ख) खेळाचे मानसशास्त्र, (ग) गुन्हेगारीचे मानसशास्त्र, (घ) दूरचित्रवाणीच्या दर्शकांचे मानसशास्त्र

## (आ) द्वितीय वर्ष : सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे

**✣ MCJ 201 : वृत्तपत्रव्यवसाय व पत्रकारिता (५० गुण)**

**(क) बातमीदारी : कार्यानुभव/सर्वेक्षण (२५ गुण)**

(१) आपल्या परिसरातील खालीलपैकी **एका विषयावरील** क्षेत्रीय पाहणी करून बातमीपत्रे/वृत्तलेख लिहा.
   १. विशिष्ट विकास योजना (उदाहरणार्थ, पंतप्रधानांची ग्राम सडक योजना, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, पाणीपुरवठा, आरोग्य योजना, कृषी क्षेत्रातील विशिष्ट योजना, साक्षरता मोहीम)
   २. ग्रामपंचायत/नगरपालिका/महापालिका यांचे कार्य

३. स्वयंसेवी संस्थेचे कार्य
४. स्थानिक समस्या
५. ग्रामस्वच्छता अभियान/नगर-स्वच्छता अभियान
६. विकासनिधींचा विनियोग (आमदार-खासदारांच्या विकासनिधीतील कामे)
७. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा
८. जिल्हा परिषदांच्या आमसभा
९. अंगणवाड्यातील शिक्षण
१०. पर्यावरणाची स्थिती
११. व्यसनाधीनता
१२. अंधश्रद्धा व लोकसमजुती
१३. फुलशेती
१४. विज्ञान प्रदर्शने
१५. कुपोषण (कोवळी पानगळ)
१६. कचरा व्यवस्थापन
१७. बचतगट आणि विकास योजना
१८. वाचनालये
१९. विशिष्ट उद्देशाने स्थापन झालेली मंडळे
२०. वैद्यकीय सेवा आणि रुग्णांचे/वैद्यांचे अनुभव

**(ख) बातमी संपादन (२५ गुण)**

(१) वृत्तपत्रातून निवडलेल्या कोणत्याही पाच बातम्या तुमच्या दृष्टीने आदर्श स्वरूपात कशा असाव्यात हे ठरवून त्या बातमीचे पुनर्लेखन करा. (टीप : मूळ बातमी चिकटवहीत डाव्या बाजूला चिकटवावी व समोर उजव्या पानावर पुनर्लेखित बातमी लिहावी. एकूण गुण : १००)

(२) एकच बातमी निरनिराळ्या वृत्तपत्रांत कोणकोणत्या पद्धतीने प्रसिद्ध झाली याची तुलनात्मक निरीक्षणे नोंदवा. या उपक्रमासाठी एका घटनेवरील पाच बातम्या याप्रमाणे तीन घटनांच्या एकूण १५ बातम्या संकलित कराव्यात. प्रत्येक घटनेवरील पाचही बातम्या सलग चिकटवाव्यात व नंतर त्याविषयी तौलनिक निरीक्षणांचे टिपण लिहावे. बातमीचे शीर्षक, लीड, आतला मजकूर, माहितीचा तपशील, भाषा इत्यादी अंगांनी हे टिपण लिहावे. (गुण विभागणी : एका टिपणास ५ गुण याप्रमाणे ३ टिपणास १५ गुण)

**❖ MCJ 202 : बातमीची विविध कार्यक्षेत्रे (५० गुण)**

**(क) बातमी : कात्रणसंग्रह (२५ गुण)**

कोणत्याही एका कार्यक्षेत्रातील बातम्यांचा संग्रह तयार करा व त्यावर आधारित पुढील स्वाध्याय पूर्ण करा (२५ गुण)

कृषी, सहकार, अर्थ-वाणिज्य व क्रीडा या कार्यक्षेत्रातील एका विशिष्ट विषयावर एकाहून अधिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या किंवा एकाच घटनेभोवती केंद्रित झालेल्या सुमारे दहा बातम्यांची कात्रणे काढून ती चिकटवहीत डकवा.

प्रत्येक बातमीचे मथळा, आशय, मांडणी, भाषा, छायाचित्र, बातमीचा स्रोत व स्थान या दृष्टीने निरीक्षण नोंदवा.

**(ख) वृत्त विश्लेषण (२५ गुण)**

राजकारण, गुन्हेगारी, समाजकारण, विज्ञान, शिक्षण, कला व संस्कृती या क्षेत्रांतील एखाद्या महत्त्वाच्या घटनेपाठोपाठ घडणाऱ्या विविध घडामोडी, त्यावरील भाष्यासह केली जाणारी वृत्तसमीक्षा, अग्रलेख, वाचकपत्रे, व्यंग्यचित्रे यांसह त्या घटनेचे वार्तामूल्य विशद करणारा अहवाल तयार करा. त्यासाठी आवश्यक ती कात्रणे, छायाचित्रे, व्यंग्यचित्रे, रेखाटने यांचे संकलन करून त्याची चिकटवही तयार करा.

**❖ MCJ 205 : मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये (५० गुण)**

**(क) वृत्तलेख -लेखन/भाषांतर (२५ गुण)**

खालीलपैकी **कोणत्याही पाच विषयांवर** एकेक वृत्तलेख लिहा.

(१) निवडणूक, (२) स्थानिक राजकारण, (३) खाजगी शिक्षणसंस्था, (४) दहशतवाद, (५) भ्रष्टाचार, (६) चित्रपटांतील करमणूक, (७) विद्यार्थी संघटना, (८) पर्यावरण चळवळी, (९) विधिमंडळातले काम करणे, (१०) वाङ्मयीन घडामोडी.

**किंवा**

इंग्रजी वृत्तपत्रांतील पुढीलपैकी **कोणत्याही पाच विषयांतील** एकेक बातमी निवडून तिचे भाषांतर करा.

(क) राजकीय बातमी, (ख) अपघात वृत्त, (ग) क्रीडावार्ता, (घ) अर्थ-व्यापारविषयक बातमी, (च) विज्ञान-तंत्रज्ञान-पर्यावरण विषयक बातमी, (छ) संसद-विधिमंडळाचे कामकाज (ज) कृषी, सहकार, ग्रामीण विकास, (झ) आंतरराष्ट्रीय घडामोडी किंवा संरक्षण-विषयक बातमी, (ट) कला-साहित्य-करमणूक किंवा लोकरुची वार्तापत्र, (ठ) नैसर्गिक आपत्ती (भूकंप, अवर्षण, इत्यादी) (ड) सामाजिक घडामोडी

**(ख) अग्रलेख/सदरलेखन/वाचकपत्रे (२५ गुण)**

(१) वृत्तपत्रातील राजकीय विषयावरील दहा अग्रलेखांचे सर्वेक्षण करा. राजकीय प्रश्नांची निवड, अग्रलेखकांचा दृष्टिकोन, प्रश्नांची मांडणी, निरुपणशैली, इत्यादी अंगांनी या अग्रलेखांबाबतचे आपले आकलन नोंदवा.

**किंवा**

(२) कोणत्याही एका वृत्तपत्रातील सदराची दहा कात्रणे काढा. त्यावर आधारित आपले आकलन स्पष्ट करणारा १००० शब्दांचा निबंध लिहा. सदर लेखकाने निवडलेले विषय व त्यांचे महत्त्व,विषयमांडणी व निरुपणशैली, गुणवैशिष्ट्ये व त्रुटी यांसह ही समीक्षा असावी.

**किंवा**

(३) वृत्तपत्रांतील वाचकपत्रांचे सर्वेक्षण (किमान २५ पत्रे निवडावीत) सर्वेक्षणात पत्रांचे विषय, ठिकाण, पत्रलेखकांचा सामाजिक स्तर, पत्रलेखनाची भाषा, विषय मांडणीची पद्धती, पत्रलेखकास मिळालेला प्रतिसाद, पत्रविषयाला मिळालेला प्रतिसाद, वाचकपत्रांचे वर्गीकरण (उदाहरणार्थ, वादविषय, दादफिर्याद, कैफियत, मतप्रकटीकरण, लक्ष्यवेध, अनुभवकथन) इत्यादी अंगांनी सर्वेक्षण अहवाल लिहावा.

**❖ MCJ 206 : दृक्–श्राव्य माध्यमे : स्वरूप व कौशल्ये (५० गुण)**

**(क) नभोवाणीसाठी लेखन (२५ गुण)**

(१) खालीलपैकी **एका कार्यक्रमाची** २० मिनिटांच्या प्रसारणासाठी संहिता तयार करा. (२५ गुण)

१. अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर संवादात्मक कार्यक्रम.

२. कुटुंबातील ताण–तणाव या विषयावर श्रुतिका.

३. 'पाण्याचा प्रश्न' या विषयावर रूपक.

४. ग्रामस्वच्छता अभियान, पल्स पोलिओ मोहीम किंवा तत्सम स्वरूपाच्या दोन विषयांवर प्रत्येकी दहा मिनिटांचे भाषण.

**(ख) दूरचित्रवाणी/स्वरसाधना सादरीकरण (२५ गुण)**

अभ्यासकेंद्रावर संमंत्रक दूरचित्रवाणी/स्वरसाधना यांबाबत वेळोवेळी प्रात्यक्षिके करवून घेतील. त्या प्रात्यक्षिकांची टिपणवही विद्यार्थ्यांनी ठेवावी. संमंत्रक विद्यार्थ्यांच्या या कौशल्य संपादनाच्या प्रगतीचे मूल्यांकन करतील व त्यास २५ पैकी गुण देतील.

**❖ EVS 201 : पर्यावरण अभ्यास**

**अंतर्गत मूल्यमापन :** २० गुणांचा गृहपाठ.

**अंतिम मूल्यमापन :** ८० गुणांची अंतिम परीक्षा

## (इ) तृतीय वर्ष : विशेष अभ्यासक्षेत्रे

**❖ MCJ 304 : पत्रकारिता आणि संबंधित कार्यक्षेत्रे (१०० गुण)**

**(क) जाहिरातसंग्रह व विश्लेषण (५० गुण)**

कोणतेही एक उत्पादनक्षेत्र निवडा (उदाहरणार्थ, 'मोबाईल' कंपन्या) आणि त्या क्षेत्रातील जाहिरातींचा संग्रह करा. या संग्रहावर आधारित विश्लेषण अहवाल तयार करा. त्यात जाहिरातीसाठी निवडलेली माध्यमे, जाहिरातींचे प्रकार, भाषिक व चित्रात्मक शैली, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी उपयोजिलेली कौशल्ये, बरोबरीच्या स्पर्धकांवर मात करण्यासाठी कल्पकतेचा वापर आणि व्यापारी चढाओढीतल्या स्थानात जाहिरातींचा वाटा अशा मुद्द्यांचा समावेश असावा.

**(ख) छायाचित्रण/गृहपत्रिका संपादन (५० गुण)**

(१) छायाचित्र–पत्रकारितेच्या संदर्भातील खालीलपैकी एक अभ्यास–प्रकल्प पूर्ण करा. **(२५ गुण)**

(क) स्वत: काढलेल्या छायाचित्रांवर आधारलेली पाच बातमीपत्रे तयार करा.

(ख) एखाद्या विशिष्ट विषयावर क्षेत्रीय छायाचित्रण करून 'छायाचित्रांवर आधारित वृत्तलेख' लिहा.

(ग) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका छायाचित्रपत्रकारावर त्याच्या छायाचित्रीकरणाच्या नमुन्यांसह परिचयपर लेख लिहा.

(घ) दंगली/पूर/दुष्काळ किंवा तत्सम आपत्कालीन प्रसंगांवर आधारित छायाचित्रांकित बातम्या/वृत्तलेख यांचा कात्रणसंग्रह तयार करा व त्याचा निरीक्षण अहवाल लिहा.

(२) पुढीलपैकी एक कार्य पूर्ण करणे. **(२५ गुण)**

(क) विशिष्ट संस्था वा उद्योगातील जनसंपर्क विभागाच्या कार्याची माहिती संकलित करून ७५० ते १००० शब्दांत अहवाल लेखन करा. अहवालासोबत संबंधित संस्था/उद्योगाची माहितीपत्रके, घडीपत्रिका, स्मरणिका, इत्यादी पूरक प्रसिद्धी साहित्यही जोडावे.

(ख) जिल्हा किंवा विभागीय माहिती कार्यालय अथवा विशिष्ट संस्था/उद्योग यांनी प्रकाशित केलेले प्रसिद्धी साहित्य संकलित करून त्यासंबंधीचा निरीक्षण अहवाल लिहा. (शब्दमर्यादा ७५० ते १००० शब्द)

(ग) एखाद्या शैक्षणिक संस्थेस, स्वयंसेवी संस्थेस अथवा सांस्कृतिक मंडळास भेट देऊन त्याच्या कार्याची माहिती मिळवा व त्यासंदर्भात त्या संस्थेचे माहितीपत्रक/घडीपत्रिका हस्तलिखित स्वरूपात तयार करा. माहिती संकलन, त्याचे सादरीकरण, मांडणी, सजावट, संज्ञापन क्षमता, इत्यादींच्या अंगांनी सदर घडीपत्रिकेचे मूल्यांकन केले जाईल.

(घ) कोणत्याही पाच गृहपत्रिका मिळवा आणि त्यांच्या संपादनाची विविध अंगांनी चिकित्सा करणारा अहवाल तयार करा.

**❖ MCJ305 : संपादन : स्वरूप व कौशल्ये (५० गुण)**

**(क) नमुना वृत्तपत्र संपादन (सांघिक कृती प्रकल्प) : ४ पृष्ठांचे दैनिक संपादित करणे. (५० गुण)**

०१. विशिष्ट दिवस निवडून वृत्तपत्राची कचेरी स्थापन करा.

०२. वृत्तपत्रीय कामकाजातील घटक लक्षात घेऊन संपादक, उपसंपादक, वार्ताक्षेत्रानुसार बातमीदार, मुद्रितशोधक, छायाचित्रकार, भाषांतरकार, लेआऊट–डिझायनर, अशा विविध कामांची वाटणी करा.

०३. नियुक्त बातमीदारांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील बातम्या लिहून त्या तारेने, फोनने, फॅक्सने, ई–मेलने किंवा इतर वेब (web) माध्यमांच्या सहाय्याने कचेरीत पाठवाव्यात. कचेरीतील उपसंपादकांनी त्या संपादित करून प्रेस कॉपी करावी.

०४. याखेरीज नभोवाणी, दूरचित्रवाणी, इत्यादी माध्यमांतून मिळणाऱ्या बातम्या संपादित कराव्यात.

०५. दिवसभरातल्या घडामोडींवर आधारित अग्रलेख व एक स्फुट लिहावे.

०६. दोन वाचकपत्रे लिहावीत.

०७. संकलित व संपादित मजकुराचे डी.टी.पी. करून पृष्ठमांडणी करावी.

०८. रात्री नभोवाणी, दूरचित्रवाणी किंवा इतर वेबमाध्यमांवर प्रसारित होणारी बातमीपत्रे ऐकून ताज्या बातम्यांचा अंतर्भाव करून दैनिकाचा मजकूर अद्ययावत करावा.

०९. व्यंग्यचित्रे, छायाचित्रे, हवामान, स्थानिक कार्यक्रम, इत्यादी आनुषंगिक मजकूर घालून ४ पृष्ठांच्या मर्यादेत वृत्तपत्र शक्य तितके परिपूर्ण करावे. वृत्तपत्रांचे नाव ठरविण्याचे स्वातंत्र्य अभ्यासकेंद्रास राहील.

१०. रात्री दहा वाजेपर्यंत वृत्तपत्र प्रसिद्ध करावे. (प्रती १००)

११. सकाळी बस–स्थानकावर २५ प्रती विक्रीस ठेवाव्यात. प्रत्येक विद्यार्थ्यास, समंत्रकास, गावातील प्रमुख व्यक्तींना नमुना अंक द्यावा. तीन प्रती मुक्त विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयात संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा; संचालक, विद्यार्थी सेवा विभाग; संचालक, मूल्यमापन विभाग यांना पाठवाव्यात.

१२. दुसऱ्या दिवशी इतर प्रसिद्ध वर्तमानपत्रे पाहून व स्थानिक वाचकांचे प्रतिसाद लक्षात घेऊन आपण प्रसिद्ध केलेल्या दैनिकांची सर्वांगीण चिकित्सा करावी व त्या चर्चेचा अहवाल तयार करावा.

१३. समंत्रकांनी सदर कृति–कार्यक्रम आपल्या देखरेखीखाली पूर्ण करावा. विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची व उपक्रमशीलतेची नोंद ठेवून त्यानुसार प्रत्येकास ५० पैकी गुण द्यावेत. या कृतिप्रकल्पात प्रत्येक विद्यार्थ्यास विशिष्ट कौशल्य सिद्ध करण्यास वाव देणारे काम देण्यात यावे.

**किंवा**

**(ख) अभ्यासप्रकल्प : खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर चालू वर्षभरातील प्रकाशनांच्या आधारे अभ्यासप्रकल्प सादर करावा. (५० गुण)**

१. मराठीतील दिवाळी अंक
२. विज्ञान प्रसाराची नियतकालिके
३. मुलांची मासिके
४. कृषिविषयक नियतकालिके
५. वैचारिक नियतकालिके

या प्रकल्प अहवालात विषयांची निवड व त्यांचे महत्त्व, मांडणी व सजावट, लेखक–संपादकांचे दृष्टिकोन, लेखनशैली, ग्राहक संख्या, जाहिराती, इत्यादी अंगांनी संपादनाची निरीक्षणे नोंदवावीत.

**किंवा**

विद्यार्थ्यांनी स्वत:चे नियतकालिक/ग्रंथ प्रकाशित केल्यास ते प्रकाशन त्यासंबंधीच्या संपादन–अनुभवाच्या टिपणासह सादर करावे.

**❖ MCJ 306 : प्रसारमाध्यमांतील संगणकीय उपयोजन व मुद्रणतंत्रे (५० गुण)**

खालीलपैकी कोणताही **एक** उपक्रम पूर्ण करून त्याची 'डिजिटल' आवृत्ती तयार करा.

१. स्वत:ची ऑफ लाइन वेबसाइट डिझाइन करा. त्यावर तुम्ही एक न्यूज़लेटर प्रसिद्ध करा.

२. 'वेब–ब्लॉग' च्या माध्यमातून पाच वार्तापत्रे प्रसिद्ध करा.

३. आठ पानांची एक गृहपत्रिका/साप्ताहिक/माहितीपुस्तिका 'डिजिटल' अथवा 'मुद्रित' माध्यमात तयार करा. या प्रकाशनात आरेखन, मांडणी, रंगसंगती, टंकांची विविधता, चित्र–छायाचित्रे यांचा वापर करा. मुखपृष्ठ, मलपृष्ठ, अनुक्रमणिका, हेडर, फूटर, मार्जिन, कॉलम साईज, संगणकीय शुद्धलेखन तपासणी, इत्यादी जी संगणकीय–मुद्रण कौशल्ये आपण शिकलात त्याचे उपयोजन करा. अंकाच्या/ग्रंथाच्या प्रास्ताविकात या प्रकाशनाच्या सिद्धीतले आपले अनुभव नोंदवा.

४. एका विशिष्ट घटनेवर इंटरनेटच्या माध्यमांतून वार्तापत्रे, वृत्तविश्लेषण, अग्रलेख, छायाचित्रे शोधून त्यांच्या साहाय्याने एक समग्र कव्हर स्टोरी तयार करा.

## अंतिम मूल्यमापन

सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी १०० गुणांची अंतिम परीक्षा असेल. परीक्षेचा कालावधी तीन तासांचा असेल. गुणविभागणी पुढीलप्रमाणे असेल.

**उत्तीर्णतेसाठी प्रत्येक अभ्यासक्रमात ४०% गुण मिळविणे अनिवार्य राहील.**

■ प्रत्येक अभ्यासक्रमाची ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा घेण्यात येईल. प्रत्येक वर्षास प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक अभ्यासक्रमास ८० गुणांची एक याप्रमाणे प्रती वर्ष सहा अभ्यासक्रमांकरिता ८० गुणांच्या ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे ४ प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणांचे ५ उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप–प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे (UA) दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.

## उत्तीर्णतेचे नियम

(अ) प्रत्येक वर्षाचे स्वतंत्र गुणपत्रक देण्यात येईल. मात्र पदवी परीक्षेचा निकाल फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील गुणांच्या आधारेच घोषित करण्यात येईल.

(आ) अंतर्गत मूल्यमापन व अंतिम परीक्षेचे गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दाखविण्यात येतील. टक्केवारी काढताना दोन्ही गटांतील गुण संयुक्तपणे विचारात घेतले जातील.

(इ) संपूर्ण शिक्षणक्रमाची टक्केवारी तिसऱ्या वर्षाच्या गुणपत्रकातच नोंदविली जाईल.

(ई) श्रेयांकातरणाच्या नियमान्वये थेट द्वितीय वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रकात पदविकेचे ८०० गुण (तात्त्विक + प्रात्यक्षिक) स्वतंत्रपणे नोंदविण्यात येतील.

(उ) कृपांक गुण व इतर गुणसवलतीचे नियम विद्यापीठाचे 'परीक्षा मंडळ' ठरवील ते याही शिक्षणक्रमास लागू राहतील.

## २.७ श्रेयांक

कोणत्याही शिक्षणक्रमासाठी विद्यार्थ्याला अभ्यास करावा लागतो. ह्यात वाचन, मनन, चिंतन, टिपणे काढणे, प्रश्नोत्तर-लेखन यांबरोबरच अभ्यासकेंद्रातील मार्गदर्शनाचा लाभ, कॅसेट्स् ऐकणे व पाहणे, चर्चा करणे, इत्यादींचा समावेश आहे. ह्या सर्व प्रकारच्या अभ्यासाला जेवढा वेळ लागतो, त्या वेळाचे मापन श्रेयांकामध्ये (Credit Point) केले जाते.

मुक्त विद्यापीठात प्रत्येक अभ्यासक्रमासाठी पाठ्यक्रम (Syllabus) निर्धारित करताना विद्यार्थ्याला किती तास अभ्यास करावा लागेल, त्याचा विचार केला जातो. एका श्रेयांकाच्या अभ्यासक्रमासाठी साधारणपणे ३० ते ३५ तास अभ्यास करावा लागतो.

